क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/९५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २१ जानेवारी, १९९९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २३ नोव्हेंबर, १९९८ (सोमवार) रोजी झालेल्या ९५ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्यात ही विनंती.

(श्र.वि.आसगांवकर)
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :

शासनाचे प्रधान सचिव (नवि-२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,

प्राधिकरणाचे अधिकारी

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या**
**९५ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २३ नोव्हेंबर, १९९८ (सोमवार) |
| वेळ | : | सायंकाळी ५.०० वाजता |
| सभास्थान | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयातील समिती कक्ष, ६ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ |

**उपस्थित सदस्य** :

| | |
|---|---|
| श्री.मनोहर जोशी<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.वसंत डावखरे<br>उपसभापती, विधान परिषद | सदस्य |
| श्री.नंदकुमार साटम<br>मुंबईचे महापौर | सदस्य |
| श्री.रा.ता.कदम<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.विजय दारुवाले<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अवधेश प्रसाद सिन्हा<br>व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको | सदस्य |

श्री.रमानाथ झा सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री.अरुण बोंगिरवार,
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

बैठकीच्या प्रारंभी मा.अध्यक्षांनी श्री.वसंत डावखरे यांची प्राधिकरणाचे सदस्य म्हणून पुर्ननियुक्ती व महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल स्वागत केले. त्यानंतर मा.अध्यक्षांनी श्री.अवधेश प्रसाद सिन्हा, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे प्राधिकरणाचे नवे सभासद म्हणून स्वागत केले.

त्यानंतर, सिडकोचे माजी व्यवस्थापकीय संचालक, श्री.विश्वास धुमाळ यानी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून केलेल्या कार्याचा मा.अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, प्राधिकरणाचे माजी सदस्य व महाराष्ट्राचे माजी मंत्री श्री.भाऊसाहेब वर्तक यांच्या दुःखद निधनाबद्दल मा.अध्यक्षांनी शोक व्यक्त केला व त्यानंतर प्राधिकरणाने श्री.वर्तक यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव एक मिनिट स्तब्ध उभे राहून मंजूर केला (जोडपत्र).

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१</u>  :  दिनांक ३१ ऑगस्ट, १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या (९४ व्या) <u>बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे</u>**

बाब क्र.२३ म्हणजे "वैश्य बँक मर्यादित आणि ग्लोबल ट्रस्ट बँक मर्यादित यांना वांद्रे-कुर्ला संकुलाच्या `जी` ब्लॉकमध्ये द्यावयाच्या अनुक्रमे सी-१२ व सी-२९ या भूखंडांच्या अधिमूल्याची रक्कम भरण्याबाबत सदर बँकांनी मागितलेल्या जादा सवलती"या विषयाच्या बाबतीतील कार्यवृत्ताच्या परिच्छेद २३.२ (क) (१) मध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे बदल करुन प्राधिकरणाने त्यानंतर कार्यवृत्त पक्के केले :-

"(१) मुंबई उच्च न्यायालयात उभयपक्षी संमत झालेल्या अटी (Joint Consent Terms) सादर करुन प्रथम त्याला मान्यता मिळवतील;"

**<u>बाब क्र.२</u>  :  दिनांक ३१ ऑगस्ट, १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९४ व्या <u>बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल</u>**

२.१ कार्यवाही अहवालातील खालील बाबींवर चर्चा केल्यानंतर प्राधिकरणाने खाली नमूद केलेल्या सूचना केल्या/निर्णय घेतले :-

(१) प्राधिकरणाने अनिक-वडाळा रस्ता व मुंबई बंदर विश्वस्तांचा तेल वाहिनी लगतचा रस्ता यामधील छोटया साखळीचे बांधकाम पूर्ण करुनही मुंबई बंदर विश्वस्तांनी त्याचा वापर करण्यास असहमती दर्शविली आहे. या शिवाय मुंबई बंदर विश्वस्तांचे

अखत्यारीतील कांही रस्ते सार्वजनिक वापरासाठी खुले करणेचे संदर्भात मुंबई बंदर विश्वस्तांना विनंती केली होती. याबाबतही त्यांचेकडून नकार प्राप्त झाला असल्यास त्याबाबत केंद्र सरकारच्या भूपृष्ट मंत्री महोदयांसमवेतची बैठक प्राथम्याने आयोजित करावी.

(२) वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रातील भूखंड दूरसंचार इमारत व कर्मचारी निवासस्थाने बांधण्यासाठी विदेश संचार निगम लिमिटेडला देणे (अ.क्र.१२ - बाब क्र.१२) चे बाबतीत विदेश संचार निगम लिमिटेड यांनी केलेल्या विनंतीचा विचार करुन, त्याच्या ठराव क्र.७९७ मध्ये अंशतः फेरबदल करुन भाडेपट्टयाच्या अधिमूल्याची अर्धी रक्कम भरण्यासाठी पहिल्या हप्त्याची मुदत दिनांक ५ नोव्हेंबर, १९९८ पासून आणखी ३ महिन्यांनी वाढविण्यास आणि संबंधित भूखंडावरील बांधकाम पूर्ण करण्यास इच्छुक पट्टेदारास नमुना भाडेपट्टा विलेखाच्या प.२ (ड) मध्ये नमूद केलेल्या ४ च्या ऐवजी ५ वर्षे एवढी मुदत देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली

(३) मे.लार्सन अँड टुब्रो लिमिटेड कंपनीला नरिमन पॉईंट, बॅकबे रिक्लेमेशन ब्लॉक क्र.३ मधील भूखंड क्र.२४० व २४०-अ हे बहुमजली वाहनतळ व व्यापारी केंद्र बांधण्यासाठी विकसित करणेसाठी भाडेपट्टयाने देण्याबाबत (अ.क्र.१४ - बाब क्र.१४) सदर भूखंडावर बांधलेले सुलभ सौचालय व होमिओपथीक सेंटरचे बांधकाम तोडण्यास प्रतिबंध करावा अशा आशयाची रिट याचिका[क्र.२०८१ (९८)]

रोटरी क्लब ऑफ बॉम्बे यानी मुंबई उच्च न्यायालयात सादर केली आहे. त्यावर विचार करुन जरुर वाटल्यास सदर बांधकामाचे, तसेच तेथे असलेली दोन झुणका भाकर केंद्रे दुस-या जागेवर स्थलांतर करण्यासाठी जरुर असलेली रक्कम खर्च करण्यास प्राधिकरणाने महानगर आयुक्तांना प्राधिकृत केले.

(४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील व्याघ्र विहार प्रकल्प (अ.क्र.२७ - पटल बाब क्र.२) चे बाबतीत प्राधिकरणाने ठेव म्हणून उपलब्ध करुन दिलेल्या रु.१.२२ कोटी पैकी रुपये १ कोटी प्राधिकरणाने अनुदान म्हणून द्यावे या सूचनेवर विचार करण्यात आला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१-अ नुसार, प्राधिकरण अधिनियमाच्या कलम १२ च्या कोणत्याही प्रयोजनाकरिता फक्त कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा महानगर प्रदेशातील अन्य प्राधिकरणास अनुदान, आगाऊ रकमा किंवा कर्जे देण्यास सक्षम आहे; तसेच सदरहू प्रकल्पासाठी अनुदान म्हणून रक्कम प्राधिकरणास देता येत नाही अशी टिप्पणीही शासनास सप्टेंबर, १९९७ मध्ये पाठविण्यात आली होती हया बाबी बैठकीच्या निदर्शनास आणण्यात आल्या. त्यावर आणखी चर्चा होऊन या बाबतीत नंतर निर्णय घेण्याचे ठरले.

२.२ त्यानंतर प्राधिकरणाने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

## बाब क्र.३ : प्रादेशिक विकासासाठी धोरण : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाची उद्दिष्टे व नीती

३.१ हा विषय बैठकीसमोर सादर करताना महानगर आयुक्तांनी बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाची उद्दिष्टे व नीती याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची काय गरज आहे याचे विवेचन केले. तसेच त्यासाठी लागणा-या निधीची उपलब्धता, उभारणी व निधीचे वाटप करण्याचे प्रस्तावित धोरण याचेही विवेचन केले.

३.२ या विषयावर झालेल्या प्राथमिक चर्चेमध्ये स्थानिक प्राधिकरणे व इतराना निधी कोणत्या निकषावर उपलब्ध करुन द्यावा, जरुर असलेला निधी कशाप्रकारे उभारता येईल, तसेच मुंबई महानगराबाहेरील अविकसित भागामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या कामात प्राधिकरणाचा सहभाग कशाप्रकारे असावा या बाबतीत सविस्तर चर्चा होणे जरुरीचे आहे असे निदर्शनास आणण्यात आले.

३.३ या विषयावर अल्प चर्चा झाल्यावर सदर विषय प्राधिकरणाच्या विशेष बैठकीसमोर विचारार्थ ठेवावा असे ठरले.

## बाब क्र.४ : निधी करीता विविध शासकीय विभाग/संस्थाकडून आलेल्या मागण्यांचा विचार करणेबाबत

४.१ या विषयावरील चर्चेच्या वेळी खाली नमूद केलेल्या सूचना करण्यात आल्या/निर्णय घेण्यात आले :-

(१) ठाणे व रायगड जिल्हा परिषदा यांच्या क्षेत्रातील अविकसित भागात रस्ते, पावसाळी गटारे वगैरे कामासाठी अनुदान देण्यासाठी सुमारे ५.५० कोटी रुपयाच्या तरतुदीस

प्राधिकरणाने मंजूरी दिली आहे. पण त्यासंबंधीची मुख्य अट म्हणजे एकूण खर्चाच्या २५% रक्कम संबंधित जिल्हा परिषदानी उपलब्ध करणे, संबंधित जिल्हा परिषदा पूर्ण करु न शकल्याने त्याचा विनियोग अजूनपर्यंत झालेला नाही. म्हणून अशा बाबतीत प्राधिकरणाने प्रचलीत धोरणात बदल करुन, ७५% ऐवजी १००% अनुदान देऊन ही कामे पूर्ण करुन घ्यावीत.

यावर झालेल्या चर्चेमध्ये प्राधिकरणाकडे निरनिराळया स्थानिक प्राधिकरणाना व इतर प्राधिकरणाना वित्त पुरवठा करण्यासाठी पैशाचा स्त्रोत उपलब्ध असणे जरुरीचे आहे असे निदर्शनास आणण्यात आले. त्या अनुषंगाने अशा कामांच्या बाबतीत जर संबंधित परिषदानी त्यानी उभारावयाच्या पैशासाठी विकासोपयोगी जमीन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सादर केल्यास, प्राधिकरणाने त्याबाबतचा सविस्तर विचार करावा आणि परिषदांच्या वतीने उपलब्ध करावयाचा निधी सदर विकास प्रकल्पांतर्गत उभारणे शक्य असल्यास, संबंधित जिल्हा परिषदांबरोबर जरुर ते करार करुन अनुदान व कर्जरुपाने पैसे उपलब्ध करुन द्यावेत असे ठरले.

(२)(१) महानगर आयुक्तांनी खालील बाबी बैठकीच्या निदर्शनास आणल्या :-

शासनाच्या विविध उपक्रमात/संस्थामध्ये प्राधिकरणाने त्याचा निधी कर्ज/मुदतठेव रुपाने गुंतविला असून तो कर्ज/ठेव घेताना कबूल केलेल्या वेळेवर संबंधितांकडून परत मिळत नाही. मात्र अशा संस्था कर्ज/ठेवीचे नुतनीकरण करण्याची वारंवार विनंती करतात, तसेच अशा संस्था व इतर शासकीय संस्था नविन कर्जे/ठेवी यांची वारंवार मागणी करतात. सिडकोने ठेवीची रक्कम वेळेवर परत केलेली नाही आणि

त्यांचेकडील ठेवीचे ३४ वेळा (जून, १९९८ पर्यंत) नुतनीकरण करण्यात आलेले आहे. तसेच ठेवीबाबतच्या अटी व शर्ती यांची त्यांनी पूर्तताही केलेली नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य कृष्णा खोरे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हयांनीही ठेवीच्या अटींची पूर्तता केलेली नाही व ते आणखी निधीची मागणी करीत असतात.

प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक ३१ ऑगस्ट, १९९८ रोजी झालेल्या मागील बैठकीमध्ये प्राधिकरणाकडून ठेव/कर्ज रुपाने पैसे घेतलेल्या शासकीय उपक्रमांनी/संस्थांनी कबूल केल्याप्रमाणे पैसे वेळेवर परत करण्याची दक्षता घेतली पाहिजे व त्याचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे आणि जे शासकीय उपक्रम/संस्था या निर्णयाचे पालन करीत नाहीत त्यांचेकडे प्राधिकरणाने पैसे गुंतवू नयेत असे ठरविले होते.

(२)(२) त्यानंतर सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांनी प्राधिकरणाने सिडकोकडे ठेव रुपाने गुंतविलेल्या रुपये २६५ कोटी पैकी फक्त एकाच बाबतीत रु.१२ कोटी, आर्थिक अडचणीमुळे दिनांक २७ सप्टेंबर, १९९८ पासून सिडको प्राधिकरणाला परत करु न शकल्याचे सांगितले आणि प्राधिकरणाने सिडकोकडील ठेवींच्या व्याजाचा दर पूर्वलक्षी प्रभावाने १२ टक्के करावा अशी विनंती केली.

(२)(३) प्राधिकरणाने मागील बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाचे काटेकोरपणे पालन झालेच पाहिजे असे नमूद करुन प्राधिकरणाच्या माननीय अध्यक्षांनी वेळेवर ठेव/कर्जाचे पैसे प्राधिकरणास परत न केलेल्या/करणा-या शासकीय उपक्रम/संस्था यांचेकडून परत फेडीचे वेळापत्रक प्राधिकरणाच्या प्रशासनाने घ्यावे अशी सूचना केली.

(२)(४) सिडकोच्या विनंतीचा विचार करुन सिडकोकडे पुढील काळात ठेव रुपाने गुंतविलेल्या निधीवर १२ टक्के दराने व्याज आकारावे असे ठरले.

४.२ प्राधिकरणाकडे निधीची मागणी करणारी प्रकरणे, प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला निधी व प्राधिकरणाने ठरविलेल्या अटी यांचा विचार करुन प्राधिकरणाने सध्या निधी कर्ज/ठेव रुपाने खाली नमूद केलेल्या प्राथम्याने उपलब्ध करुन द्यावा असे ठरविले :

| | | रु.(कोटीत) | |
|---|---|---|---|
| (१) | शिवशाही पुनर्वसन प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे अनामत ठेवीच्या रुपाने | १०० | |
| (२) | राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग | ५० | कोकण विभागातील रस्त्यासाठी |
| (३) | बृहन्मुंबई महानगरपालिका | १० | |
| (४) | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | ५० | |
| (५) | सिडको | ५० | रु.१०० कोटी पैकी उर्वरित रक्कम |
| (६) | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | ५० | |
| | एकूण | ३१० | |

त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८०६</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या निधीमधून व सध्या गुंतवणूक केलेला निधी परिमित होण्यासापेक्ष, तसेच प्राधिकरणाने ठरविलेल्या अटी सापेक्ष खाली नमूद केलेल्या प्राथम्याने शासनाच्या विभागांस/प्राधिकरणाना त्यांच्या नांवासमोर नमूद केलेला निधी प्राधिकरणाने कर्ज/ठेव रुपाने नेहमीच्या अटी व शर्ती प्रमाणे उपलब्ध करुन देण्यास प्राधिकरण या द्वारे मान्यता देत आहे :-

रु.(कोटीत)

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | शिवशाही पुनर्वसन प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे अनामत ठेवीच्या रुपाने | १०० | |
| (२) | राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग | ५० | कोकण विभागातील रस्त्यासाठी |
| (३) | बृहन्मुंबई महानगरपालिका | १० | |
| (४) | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | ५० | |
| (५) | सिडको | ५० | रु.१०० कोटी पैकी उर्वीरत रक्कम |
| (६) | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | ५० | |
| | एकूण | ३१० | |

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, पुढील काळात सिडकोकडे ठेव रुपाने गुंतविलेल्या निधीवर द.सा.द.शे. रुपये १२ प्रमाणे व्याज आकारण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे."

**बाब क्र.५ : प्रस्तावित शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कंपनी आणि मुंबईतील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनासाठी अनामत ठेव रु.३०० कोटी देण्याबाबत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव व या अगोदरील विषयावर घेतलेला निर्णय यांचा विचार करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८०७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक २५ सप्टेंबर, १९९८ च्या शासकीय निर्णयानुसार शिवशाही पुनर्वसन प्रकल्प या शासकीय कंपनीस उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये ३०० कोटी एवढी रक्कम शासनाच्या गृहनिर्माण विभागास अनामत मुदत ठेव म्हणून उपलब्ध करुन देण्यास प्राधिकरण याद्वारे तत्वतः मान्यता देत आहे. सदर ठेव ही एक वर्षाच्या कालावधीकरीता असून त्यावर १४ टक्के व्याज प्राधिकरणाकडून आकारण्यात यावे. तसेच प्राधिकरणाच्या ठेवीबाबतच्या इतर अटी व शर्ती ही त्यास लागू राहतील.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, अनामत ठेव म्हणून ठेवण्यास मान्यता दिलेल्या रकमेपैकी तुर्त रु.१०० कोटी एवढी रक्कम प्राधिकरणाकडे उपलब्ध होणा-या निधीनुसार व गुंतवणूकीच्या मुक्ततेनुसार शासनास उपलब्ध करुन देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, शासनाची गरज लक्षात घेऊन या अगोदर महानगर आयुक्तांनी रु.२५ कोटी एवढी रक्कम अनामत मुदत ठेव म्हणून शासनास उपलब्ध करुन दिली होती त्यास प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, अनामत ठेवींची उरलेली रक्कम शासनाच्या या कामासाठी लागणा-या निधीच्या गरजेनुसार व प्राधिकरणाकडे उपलब्ध निधीनुसार उपलब्ध करुन देण्याबाबतचे प्रस्ताव महानगर आयुक्तांनी प्राधिकरणास यथाकाल सादर करावेत."

**बाब क्र.६ : कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये प्रसिध्दीकरण करण्यासाठी मुदतवाढ**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८०८ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना तयार करुन

प्रसिध्द करण्यासाठी दिनांक ५ जुलै, १९९८ पासून एक वर्षाची मुदत वाढ मागण्यासाठी शासनास अर्ज करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच सदर अर्ज व इतर पत्र व्यवहार करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : वडाळा भारवाहकतळ येथील परिबध्द क्षेत्र व वाहन तळासाठी असलेला भूखंड यांचे प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकरिता भाडेतत्वावर वाटप करणे**

७.१ सदर बाब टिप्पणी द्वारे प्राधिकरणाच्या विचारार्थ खाली नमूद केलेले तीन प्रस्ताव सादर करण्यात आले होते :-

(१) वडाळा भारवाहक तळातील बी-२ या इमारतीच्या तिस-या मजल्यावरील १२९०-९४ चौ.मी. परिबध्द क्षेत्र प्रादेशिक परिवहन अधिकारी याच्या कार्यालयासाठी भाडेतत्वाने देणे व त्यासाठी भाडयाचा दर ठरविणे

(२) वडाळा भारवाहक तळावरील ३ वाहन तळापैकी ७१५४ चौ.मी.क्षेत्र असलेला एक वाहन तळ भूखंड प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना वाहनांच्या परिक्षणार्थ भाडेतत्वावर देणे. सदर भूखंडावर एक वजन काटा व लहान शेड बांधण्यास प्रादेशिक परिवहन अधिका-याने मान्यता मागितली होती

(३) वडाळा भारवाहक तळाच्या टप्पा २ किंवा टप्पा ३ मध्ये अंदाजे ३ एकर जमीन प्रादेशिक परिवहन अधिकारी याना वरील (१) मध्ये नमूद केलेले कार्यालय व (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे परिक्षणार्थ द्यावी या विनंतीचा विचार करणे.

७.२ वर नमूद केलेले प्रस्ताव क्र.(२) व (३) वर चर्चा करताना प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालयास वाहनांच्या परिक्षणार्थ वडाळा भारवाहक तळ येथे जागा उपलब्ध करुन दिल्यास त्यामुळे सध्या एव्हरार्डनगर येथील उड्डाण पुलावरुन येणा-या वाहनामुळे चुनाभट्टी येथे होणा-या वाहनांच्या खोळंब्यामध्ये आणखी भर पडेल असे मत प्रदर्शित करण्यांत आले. त्यामुळे याबाबतीत सविस्तर अभ्यास करुन जरुर असल्यास सुधारित प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

७.३ प्रस्ताव (१) प्रमाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयास प्रस्ताविल्याप्रमाणे बी-२ इमारतीमधील तिस-या मजल्यावरील १२९०-९४ परिबध्द क्षेत्र भाडेपट्टयाने देण्यास प्राधिकरणाने मान्यता देताना भाडयाचा दर शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग ठरविल तो आकारावा असे ठरविले व त्याप्रमाणे खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८०९ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे प्रादेशिक परिवहन अधिकारी (आर.टी.ओ.) कार्यालयांसाठी वडाळा भारवाहकतळ येथील बी-२ इमारतीच्या तिस-या मजल्यावरील १२९०-९४ चौ.मी.चे परिबध्द क्षेत्र कार्यालयीन वापरासाठी शासनाचा सार्वजनिक विभाग ठरविल त्या दराने तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर परिवहन आयुक्त यांना ५ वर्षाच्या कालावधीसाठी अथवा त्यांना भूखंड देण्याचे ठरविल्यास त्या भूखंडावर ते कार्यालयीन इमारत व

वाहन परीक्षण तळ विकसित करतील, यामध्ये जे लवकर असेल त्या कालावधीसाठी, वितरित करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.८</u> : वडाळा भारवाहक तळ टप्पा-१ मधील पेट्रोल/डिसेल पंप आणि सर्विस स्टेशनसाठी <u>राखून टेवलेल्या दुस-या भूखंडाचे वितरण</u>**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८१०** :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा विनियम क्र.४ (तीन) यान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा व याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर शक्तींचा वापर करुन आणि त्याच्या दिनांक १/१०/१९९२ चा ठराव क्र.५३९ मध्ये अंशत: फेरबदल करुन, प्राधिकरण याव्दारे ३५० चौ.मिटर अनुज्ञेय बांधीव क्षेत्रासह १४८० चौ.मिटरचा वडाळा भारवाहक तळातील सी.एस.क्र.७ मधील भूखंड पेट्रोल/डिझेल पंप आणि सर्विस स्टेशनसाठी इंडो बर्मा पेट्रोलियम कंपनी लिमिटेड (आयूबीपीएल) यांना बांधीव क्षेत्राच्या प्रति चौरस मिटरला रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) या भाडेपट्टा अधिमूल्याच्या दराने देऊ करण्यास पुढील अटी व शर्तीवर मान्यता देत आहे :-

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा सुधारित विनियम क्र.९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आयबीपीएल भाडे अधिमूल्याची अर्धी रक्कम देकार

स्विकारण्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत देईल आणि उरलेली रक्कम त्यानंतर तीन महिन्याच्या आत देईल;

२) भाडेपट्टयाचा कालावधी ३० वर्षांचा राहिल; व

३) भूखंडाचा प्रत्यक्ष ताबा बृहन्मुंबई महानगर पालिकेने सुधारित आराखडे मंजूर केल्यानंतर देण्यात येईल.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, हा ठराव कार्यान्वित करण्यास आणि आयबीपीएल बरोबर नमुना "डी" मधील भाडेपट्टा विलेख त्यामध्ये जरुर ते बदल करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाव क्र.९ : "ॲडव्हांटेज महाराष्ट्र" मध्ये सादर केलेला मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचा प्रकल्प

९.१ विषय टिप्पणीत वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये भूमिगत वाहन तळ, बगीचा आणि शॉपिंग सेंटर यासाठी असलेल्या व "ॲडव्हांटेज महाराष्ट्र"मध्ये अंतर्भूत केलेल्या भूखंडा संबंधीचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर केला होता. व्यापारी जागेवर शॉपिंग सेंटर असा वापर करण्याचे बंधन न ठेवता त्याचा वापर बोलिदाराच्या मर्जीवर ठेवून व वाहनतळ बांधण्याचे बंधन ४०,००० चौ.मीटर म्हणजे निम्यावर आणूनसुध्दा सध्याच्या परिस्थितीत योग्य प्रतिसाद मिळणार नाही असे

प्रतिपादन प्रस्तावात होते. त्याची नोंद घेऊन प्राधिकरणाने इच्छुक विकासकांशी आवश्यक ती चर्चा करुन भूखंडाचे वितरणासाठी सुधारित अटींवर सहा महिन्याच्या आत पुनः निविदा मागवाव्यात असे प्राधिकरणाने ठरविले व त्याप्रमाणे खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८११ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये भूमिगत वाहन तळ, बगीचा आणि शॉपिंग सेंटर यासाठी असलेल्या जागेच्या विकासार्थ या कार्यवृत्ताच्या प.९.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदा मागविण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाब क्र.१० : महानगर आयुक्त यांना प्रशासकीय/वित्तीय अधिकार हस्तांतरीत करण्याबाबत

१०.१ विषय टिप्पणीतील प्रस्तावांचा विचार करुन खालील प्रस्तावांस प्राधिकरणाने सूचविल्याप्रमाणे मंजूरी दिली व त्याबाबतचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित केले :-

(१) बाब टिप्पणीच्या प.१ (१) मध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे, प्राधिकरणातील विविध विकासांच्या प्रकल्पांकरिता सल्लागारांची प्रत्येक बाबतीत रु.१० लाखापर्यंत फी देऊन नेमणूक करणे;

(२) बाब टिप्पणीच्या प.१ (२) मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रशासकीय वापरामुळे मोडकळीस आलेल्या/खराब झालेल्या वस्तु (उदा.खुर्च्या, टेबले, कपाटे, गणकयंत्रे,

पुस्तके, इत्यादि) गहाळ झालेल्या वस्तु (उदा.पुस्तके, इत्यादि) याचे निर्लेखन करणे;

(३) बाब टिप्पणीच्या प.१ (४) मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे एकाचवेळी रु.५ कोटी पर्यंत निविदा मागविण्याचे व मान्य करण्याचे तसेच अंदाजपत्रकात तरतूद नसलेल्या कामासाठी/पुरवठयासाठी रु.५० लाखापर्यंत खर्च करण्याचे अधिकार;

(४) बाब टिप्पणीच्या प.१ (५) मध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या वैद्यकीय रकमेची प्रतिपूर्ती, कर्मचा-यासाठी रुग्णालये दाखल्याची पटनोंदणी करणे, कर्मचा-यासाठी सवलतीच्या दरात उपहारगृहाची सोय करणे/ जादा कामाचा भत्ता/ संगणक भत्ता इत्यादि देणे, सुट्टीच्या दिवशी अल्पोपहार/वाहन भत्ता देणे, पदे नसताना अल्पमुदतीसाठी अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करणे व रजेबाबतचे नियम शिथिल करणे, उत्सव अग्रीम देणे/ विशेष अग्रीम मंजूर करणे/ टेलिफोन, वर्तमानपत्र इत्यादि, तसेच ज्यामुळे व्यवस्थापन व कर्मचारी यांच्यातील संबंध सलोख्याचे रहातील आणि कामाचा उरक व दर्जा वाढेल अशा सर्व सुविधांसाठी खर्च करणे.

(५) बाब टिप्पणीच्या प.१ (६) मध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे कार्यालयीन कामाकरिता हॉटेलमध्ये रहाण्याच्या खर्चाची परिपूर्ती प्राधिकरणाचे कर्मचारी, अधिकारी, कार्यकारी समितीचे सदस्य व इतर संबंधित अधिकारी यांचे बाबतीत

१०.२ बाब टिप्पणीच्या प.१ (४) मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे एकावेळी रु.२ कोटी पर्यंत निविदा मागविण्याचे व मान्य करण्याचे अधिकार मुख्य अभियंता याना प्रत्यायोजित करण्यासही प्राधिकरणाने मान्यता दिली.

१०.३ बाब टिप्पणीच्या प.१ (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थानिक संस्थांना कर्जाऊ दिलेली रक्कम प्राधिकरणास वेळेवर परत न केल्यास प्राधिकरण दंडनीय व्याज आकारते व वसूल करते व कांही बाबतीत असे दंडनीय व्याज कार्यकारी समिती/प्राधिकरण यांची मान्यता घेऊन माफ करण्यात येते. त्याबाबतचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रत्यायोजित करावे असा प्रस्ताव होता. तसेच बाब टिप्पणीच्या प:१ (३) मध्ये मुंबई नागरी विकास प्रकल्प (MUDP) फिरता निधी विनियमानुसार रु.१० लाख पर्यंत अनुदान व रु.१ कोटी पर्यंत कर्ज द्यावयाचे महानगर आयुक्त यांना देण्यात आलेले अधिकार अनुक्रमे रु.२५ लाख व रु.२ कोटी पर्यंत वाढवावे असा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर चर्चा झाल्यानंतर वाढीव अधिकार प्राधिकरणाने गठीत करावयाच्या समितीस द्यावे असे ठरले.

**बाब क्र.११ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना पाचवे वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार देय होणाऱ्या थकबाकीच्या अनुषंगाने रु.२५००/- एवढी रक्कम आगावू मंजूर करण्याबाबत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८१२ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे देय होणाऱ्या थकबाकीच्या अनुषंगाने रु.२५००/- एवढी रक्कम प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या वित्त विभागाचा दिनांक ९ ऑक्टोबर, १९९८ निर्णय क्र.वेपूर/१०९८/प्र.क्र.२०/९८/सेवा-१० प्रमाणे दिवाळीपूर्वी अदा करण्यांत आली त्यास प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, भविष्यात वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे देय होणा-या थकबाकीच्या अनुषंगाने शासन शासकीय कर्मचा-यांना अग्रीम म्हणून आणखी रक्कम मंजूर करील तेवढी रक्कम प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना अग्रीम म्हणून अदा करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकरण याद्वारे प्राधिकृत करित आहे."

खाली नमूद केलेल्या बाब क्र.१२ व बाब क्र.१४ हया एकत्रितपणे विचारात घेण्यात आल्या :-

**बाब क्र.१२ : वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रातील भूखंड इंडियन न्यूजपेपर सोसायटीला कार्यालय संकुल उभारण्यासाठी देणेबाबत**

**बाब क्र.१४ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" व "जीएन" ब्लॉकमधील सामाजिक संस्थासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाच्या वितरणाचे धोरण व पध्दती**

१. बाब क्र.१४ च्या विषय टिप्पणीमध्ये नमूद केलेल्या प्रस्तावात खाली नमूद केल्याप्रमाणे बदल करुन प्राधिकरणाने त्यास मंजूरी दिली :-

१) सामाजिक संस्थांना द्यावयाच्या भूखंडावर एकुण बांधकाम क्षेत्राच्या जास्तीत जास्त १५% जागेचा कार्यालय व संस्थात्मक कामासाठी वापर करण्यास भूखंडधारक संस्थांना परवानगी द्यावी; आणि

२) कारणे लिखित स्वरुपात नमूद करुन जागा वितरणाच्या निकषामध्ये बदल करण्याचे प्राधिकरणाचे अधिकार प्राधिकरण याबाबतीत अबाधित ठेवीत आहे. याबद्दलची सूचना संस्थांना भूखंड द्यावयाच्या पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात यावी.

२. इंडियन न्यूज पेपर सोसायटीने भूखंडासाठी केलेल्या मागणीच्या बाबतीत संस्थांसाठी राखून ठेवलेला एखादा भूखंड सदर संस्थेसाठी देता येईल किंवा कसे याबाबतीत विचार करुन सुधारित प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा असे प्राधिकरणाने ठरविले.

३. वरील निर्णयाच्या अनुषंगाने प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८१३</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ (२) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या विनियम क्र.१६ मधील अधिकारांचा व या बाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि उक्त विनियमाच्या विनियम (४) च्या तरतुदी शिथिल करुन, वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" व "जीएन" ब्लॉकमधील प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीपैकी सुमारे एक हेक्टर क्षेत्राची निवासी उपयोगासाठी संकुलाच्या मंजूर नियोजन प्रस्तावात दर्शविलेली व प्रारुप फेरबदलान्वये सामाजिक संस्था संकुलांसाठी प्रस्तावित केलेली जमीन ही बाब टिप्पणीमध्ये परिच्छेद ३ मध्ये १ ते १० येथे दर्शविलेले निकष तसेच या कार्यवृत्ताच्या प.१ मध्ये घेतलेले निर्णय यांच्या आधारे योग्य त्या सामाजिक संस्थांना वितरीत करण्यासाठी जाहिरात देऊन सदर संस्थांकडून अर्ज मागविण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, विविध सामाजिक संस्थांकडून प्राधिकरणास प्राप्त झालेल्या अर्जामधून वर उल्लेखिलेल्या निकषामध्ये बसणा-या गुणवान सामाजिक संस्थांची यादी व सदर संस्थांस भूखंड वाटप करण्यासाठी योग्य तो प्रस्ताव प्राधिकरणास योग्यवेळी सादर करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : अमेरीकन स्कूल ऑफ बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांची २१२.२ चौ.मी क्षेत्रफळाचा आरजी-८ हा भूखंड मिळण्याबाबतची विनंती**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव, विषयांकीत जागेवर पट्टेदार कोणतेही बांधकाम न करता ती मोकळी ठेवील या अटीसापेक्ष मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८१४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) मधील अधिकारांचा आणि मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या विनियम क्र.४ (तीन) या अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा तसेच प्राधिकरणाच्या दिनांक ९.९.१९९६, ठराव क्र.६९४ चा संदर्भ लक्षात घेऊन आणि या बाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन, प्राधिकरण अमेरीकन स्कूल ऑफ बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांना २१२.२ चौ.मी.क्षेत्रफळ असलेला क्र.आरजी-८ हा भूखंड त्याचा चटई क्षेत्र

निर्देशांक एक एवढा सिमीत ठेऊन, परिबध्द क्षेत्राच्या द.चौ.मी.ला रु.१६,१००/- एवढे अधिमूल्य आकारुन ८० वर्षासाठी भाडेपट्टयाने देण्यास मान्यता देत आहे. या संदर्भात अशीही अट घालण्यात येत आहे की, वाढीव जागेवर पट्टेदार कोणतेही बांधकाम न करता ती मोकळी ठेवील आणि उर्वरीत ०.५ चटई क्षेत्र निर्देशांकासाठी ज्या वेळी पट्टेदाराला मान्यता देण्यात येईल त्यावेळी त्यांना त्यावेळच्या बाजारभावाने अधिमूल्य द्यावे लागेल. या संबंधीच्या इतर अटी व शर्ती यापूर्वी अमेरीकन स्कूल ऑफ बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांच्याशी वांद्रे-कुर्ला संकुलातील ब्लॉक `जी` मधील भूखंड क्र.एससीएल-२ यासाठी केलेल्या भाडेपट्टा कराराप्रमाणे व मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ प्रमाणे असतील.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठराव कार्यान्वित करण्यासाठी व भूखंड क्र.आरजी-८ या संदर्भात अमेरीकन स्कूल ऑफ बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांच्याशी भाडेपट्टा करार करण्यासाठी व तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील प्रपत्र (ड) मध्ये दिलेल्या भाडेपट्टा करारात आवश्यक ते बदल करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

**********************

जोडपत्र ...

<u>जोडपत्र</u>

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९५ वी बैठक

दिनांक : २३ नोव्हेंबर, १९९८

## : ठराव :

"श्री.हरी गोविंद उर्फ भाऊसाहेब वर्तक, माजी महसूल मंत्री यांचे दिनांक ७ ऑक्टोबर, १९९८ रोजी निधन झाले. श्री.वर्तक हे दिनांक २३.४.१९७७ ते दिनांक ४.५.१९७८ या कालावधीत, ठाणे जिल्हा नियोजन मंडळाचे अध्यक्ष या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.वर्तक यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि अकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री.वर्तक यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**************